Vowels of the People Association
Agitate | Educate | Ignite | Organize | Uplift

contact@vopa.in

CIN:U85300PN2018NPL178277 www.vopa.in

# Vowels of the People Association

Agitate | Educate | Ignite | Organize | Uplift

सप्रेम नमस्कार,

सांगताना आतिशय आनंद होत आहे कि आपल्या सगळयांच्या साथीने आणि प्रोत्साहनाने सुरु झालेला वोव्हेल्स ऑफ द पिपल असोसिएशन चा प्रवास आता तीन महिने पूर्ण करत आहे. ही संस्था सुरु करण्याचे दोन प्रमुख उद्देश आहेत. एक म्हणजे समाजासाठी काम करणाऱ्या मागास भागातील सामाजिक संस्थांचे सक्षमीकरण करणे आणि दुसरा, सामाजिक काम करू इच्छिणाऱ्या दुर्बल घटकातील तरुणांनामध्ये वैचारिक स्पष्टता व संविधानिक मूल्ये ह्यांची रुजवणूक करणे.

संस्थेचा पहिल्या तीन महिन्यातील (जुलै – सप्टेंबर २०१८) प्रवास तुमच्या समोर सादर करत आहोत.

**ठळक घडामोडी:**

१) सारिका व वेदवती यांच्या सहकार्याने संस्थेचे रजिस्ट्रेशन, बेसिक नियम, आणि बँक अकाऊंट इ. सर्व कायदेशीर व किमान गरजेच्या बाबी पूर्ण झाल्या आहेत. वेबसाईट देखील सुरु झाली आहे.
२) प्रमोद मुजुमदार काकांच्या मदतीने आपल्या संस्थेला पुण्यात कोथरूड भागात कार्यालय सुद्धा मिळाले आहे.
३) कार्यालयासाठी लागणारे साहित्य जसे कि टेबल, खुर्च्या, प्रिंटर, व्हाईटबोर्ड इत्यांदी गोष्टींची सोय झाली आहे.
४) सुरवातीचा बराच काळ मराठवाड्यातील संस्था व तरुणांवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय झाला आहे.

## सध्या सुरु असलेल्या कामांचा तपशील

### निषाद प्रकल्प

१) सोनदरा गुरुकुलम (बीड) :

बीडजवळ डोमरी येथे दुर्गम भागामध्ये सुरु असलेली ही निवासी मुलांची शाळा आहे. उसतोडणी कामगारांच्या मुलांसाठी सुरु झाल्याची पार्श्वभूमी लाभलेली ही शाळा मराठवाड्याचा विकास करण्याचे उद्दिष्ट जपते.

निषाद प्रकल्पांतर्गत या शाळेबरोबर आपले काम सुरु झाले आहे. कामाचे प्रभावी नियोजन करणे, उद्दिष्टे ठरवणे, त्यानुसार देखरेखीच्या व मोजमापाच्या व्यवस्था उभारणे, शिक्षकांना प्रशिक्षित करणे, व्यवस्था व प्रक्रियांमध्ये

सुटसुटीतपणा आणणे त्यांमध्ये लोकशाही मुल्ये रुजवणे, परिसरातील तरुणांसाठी विकास प्रकल्प उभारणे हा आपल्या येथील कामाचा प्राथमिक हेतू आहे. आत्तापर्यंत चार वेळा स्टाफ ट्रेनींग अंतर्गत विविध सत्रे घेण्यात आली आहेत. सोनदरा गुरुकुलम शाळेसाठी नवीन इमारत उभारत आहे, त्याच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी सुद्धा आपण तांत्रिक सहकार्य करत आहोत.

कार्यकर्ता संख्या – २० , विद्यार्थी संख्या – २००, संस्थेला आपल्या भेटी – ६

२) स्नेहालय (अहमदनगर) :

स्नेहालय अंतर्गत HIV बाधित, अनाथ आणि निम्न सामाजिक व आर्थिक स्तरातील मुलांसाठी चालवल्या जाणाऱ्या शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी आपण काम सुरु केले आहे. त्यांतर्गत वार्षिक कामाचे नियोजन, कार्यकर्त्यांचे व शिक्षकांचे प्रशिक्षण (कौशल्ये व मूल्यवर्धन), शिक्षणासाठी पोषक वातावरण निर्मिती करणे, संशोधनात्मक काम सुरु करणे इ. कामावर भर असेल. सद्य परिस्थितीचा अभ्यास व विश्लेषण करणे हा कामाचा टप्पा सध्या पार पडला आहे.

कार्यकर्ता संख्या – ३०, विद्यार्थी संख्या – १५०, संस्थेला आपल्या भेटी - ४

३) डॉ. एम एल ढवळे मेमोरिअल ट्रस्ट (पालघर) :

डॉ. एम एल ढवळे मेमोरिअल ट्रस्ट या संस्थेचे भोपोली, पालघर येथे एक युनिट आहे. येथे आरोग्य, शिक्षण, रोजगार निर्मिती, महिला बचत गट, ऑर्गनिक शेती या क्षेत्रात काम चालू आहे. तेथील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण करणे (कौशल्ये व मूल्यवर्धन), कामाचे नियोजन प्रभावी करणे, सुधारित व्यवस्था बसवणे इ. असे येथील आपल्या कामाचे स्वरूप आहे. सद्य परिस्थितीचा अभ्यास व विश्लेषण करणे हा कामाचा टप्पा सध्या पार पडला आहे.

कार्यकर्ता संख्या – १५, संस्थेला आपल्या भेटी – १

४) ज्ञानसंपदा (अहमदनगर):

अहमदनगर शहरातील ही एक इंग्रजी माध्यम शाळा आहे. जेष्ठ शिक्षण तज्ञ हेमाताई होणवाड यांच्या साथीने येथील शिक्षकांचे प्रशिक्षण करण्याचे काम सुरु झाले आहे. त्यांतर्गत २ वेळा प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.

शिक्षक संख्या – ३०, विद्यार्थी संख्या – ६००, संस्थेला आपल्या भेटी – २

ह्या व्यतिरिक्त ‘मशाल’ व ‘स्वच्छ’ या पुण्यातील संस्थांसाठी काही सत्रे घेण्यात आली.

**<u>एकलव्य प्रकल्प</u>:** (नाव अजून फायनल ठरले नाही)

ह्या प्रकल्पा अंतर्गत आपण तरुणांसोबत शैक्षणिक शिबीरे घेण्यासाठी मराठवाड्यातील (बीड) विविध शैक्षणिक संस्था, तरुणांचे गट व कॉलेजेस सोबत बोलणी करत आहोत. प्रत्यक्ष शिबिरे नोव्हेंबर २०१८ पासून सुरु होतील.

## काही आनंदाचे क्षण:

- हे काम करताना आपल्या स्नेहींना आणि त्यांच्या संस्थाना मदत करु शकत आहोत ह्यात आनंद वाटतो आहे. उदा. अश्विन भोंडवे, सुनील काका.
- सामाजिक क्षेत्रात बरीच वर्ष काम करणाऱ्या अनेक मान्यवर व्यक्ती जसे कि डॉ.अनिल अवचट, गिरीश कुलकर्णी, हेमाताई होनवाड, प्रमोद मुजुमदार, संजीवनी कुलकर्णी, डॉ.आनंद करंदीकर, सुदामकाका भोंडवे, इ. कौतुक व प्रोत्साहनातून आपला उत्साह वाढवत आहेत.
- ऑफिस साठी जागा मिळाल्यानं सामाजिक प्रश्नावर काम करणाऱ्या आपल्या अनेक मित्रांना हक्काचे आणखी एक विसाव्याचे स्थान मिळाले आहे. किमान दिवसाआड कुणीतरी मित्र-मैत्रीण भेट द्यायला येतात तेव्हा आम्हालाही आनंद होतो.
- ह्याशिवाय आपले मित्र-मैत्रिणी, सायली, सनत, केदार, रविकांत, निखिल, वेदवती, सारिका आणि असे अनेक लोक मदतीला आणि मनोबल वाढवायला बरोबर आहेत याचा आनंद होतो.

मागील तीन महिन्यात अशा प्रकारचे काम सुरु झाले आहे. आम्ही आपल्या सर्वांच्या मदतीसाठी कायमच ऋणी आहोत. प्रत्येक तीन महिन्याचा कामाचा अहवाल आम्ही आपल्यासमोर सादर करत राहू. अधिक माहितीसाठी जरूर संपर्क करा.

> “या विविध कामांमध्ये तुम्हाला जर काही मदत करण्याची इच्छा असेल तर जरूर कळवा. तसेच या अभियानाला आर्थिक मदतीची देखील गरज आहे. डोनेशन देण्यासाठी बँक अकाऊंट ची माहिती येथे पहा.
>
> आपल्या आमदानीतून प्रती महिना रु.५०० / रु.१००० किंवा जास्त अशा रकमेची मदत तुम्ही करू शकता. संस्थेच्या सुरवातीच्या या प्रवासात ही मदत खूप मोलाची ठरेल. तिचा विनियोग कसा होत आहे हे आम्ही वेळोवेळी सादर करूच.”

धन्यवाद,

प्रफुल्ल, आकाश, राही

व्होव्हेल्स ऑफ द पीपल असोसिएशन टीम.

९४०४८४१८३९